Indian Academy of Pediatrics (IAP)
महाराष्ट्र राज्य बालरोग तज्ज्ञ संघटना (MAHAIAP)

# प्रकरण ८ :

# बाळाचा सुरुवातीच्या काळातील विकास


अध्यक्ष २०२२ : डॉ. हेमंत गंगोलिया
सचिव २०२२-२३ : डॉ. अमोल पवार
मार्गदर्शक : डॉ. जयंत उपाध्ये
समन्वयक : डॉ. नरेंद्र नानिवडेकर
अनुवाद : डॉ. सदाचार उजलंबकर
पुनरावलोकन : डॉ. नरेंद्र नानिवडेकर,
श्री. अविनाश शिरगावकर

*Convener:* **Chhaya Prasad**
*Members:* **Geeta Patil, Jayantkumar V Upadhye, Subhash Singh Slathia**
*Reviewer:* **Jayakumar C Panicker**




## १० वारंवार विचारले जाणारे प्रश्न

१. मी माझ्या बाळाला वाचून दाखवायला कधी सुरुवात करावी?
२. माझ्या ६ महिन्याच्या बाळाला मोठ्या आवाजात वाचून दाखविण्याचे काय फायदे आहेत?
३. मी माझ्या मुलाशी सकारात्मक संवाद कशाप्रकारे साधू शकतो/शकते?
४. माझ्या मुलाने कुटुंबातील सदस्यांशी व त्याच्या भावंडांशी संवाद साधणे कितपत महत्वाचे आहे?
५. आपल्या सहभागातील हिस्सा दुसऱ्याला देणे हे जीवनकौशल्य (शेअरींग) माझ्या मुलाने आत्मसात करणे का महत्वाचे आहे?
६. मी माझ्या मुलाला गोष्टी वाटून घ्यायला म्हणजेच शेअरींग करायला कसे शिकवू शकतो?
७. १४ महिन्याच्या माझ्या मुलामध्ये एकमेकातील स्नेहभाव जोपासणारी कोणकोणती सामाजिक कौशल्ये असली पाहिजेत?
८. 'सामाजिकीकरण' माझ्या मुलाच्या दृष्टीने का महत्वाचे आहे? मुलाच्या सर्वांगीण विकासावर त्याचा काय परिणाम होतो?
९. माझ्या दोन वर्षाच्या मुलाचे योग्य सामाजिकीकरण होण्यासाठी व त्याच्या भाषेचा योग्य विकास होण्यासाठी 'स्पीच ॲप' व 'फोनिक्स ॲप' ची भूमिका काय आहे?
१०. इंटरनेट, ॲप्लिकेशन्समुळे मुलांचे शिक्षण कशाप्रकारे प्रभावित झाले आहे?


**Under the Auspices of the IAP Action Plan 2020–2021**

**Piyush Gupta** IAP President 2021
**Remesh Kumar R** IAP President-Elect 2021
**Bakul Parekh** IAP President 2020
**GV Basavaraja** IAP HSG 2020–2021
**Deepak Ugra** National Co-ordinator


Ch-008.indd 1 11-09-2021 16:43:47

© Indian Academy of Pediatrics

## IAP Parent Guideline Committee

**Chairpersons:** Piyush Gupta, Bakul Parekh
**IAP Co-ordinators:** GV Basavaraja, Harish Kumar Pemde, Purna Kurkure

### Core Group

*National Co-ordinator:* ***Deepak Ugra***
*Member Secretary:* ***Upendra Kinjawadekar, Samir Dalwai***
*Members:* ***Apurba Ghosh, CP Bansal, Santosh Soans, Somashekhar Nimbalkar, S Sitaraman***

Ch-030.indd 2 22-01-2021 11:47:58


8

# बाळाचा सुरुवातीच्या काळातील विकास

प्रश्न (१)

## मी माझ्या बाळाला वाचून दाखवायला कधी सुरुवात करावी?

- लहान मुलांसाठी मोठ्याने वाचन करणे ही एक आनंददायी प्रक्रिया आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे ही प्रक्रिया भाषेचा विकास होण्यासाठी मजबुत पाया रचण्याचे काम करते. तसेच सृजनशील कौशल्य वाढीसाठीही मदत करते. बाळाला मोठ्याने वाचून दाखविण्याची प्रक्रिया खूप क्लिष्ट, गंभीर किंवा खूप वेळ मोडणारी असण्याची बिल्कुल गरज नाही. उलटपक्षी, ज्यावेळी आई व बाळ हे दोघेही आरामात असतात, तसेच त्यांना कोणतीही घाई नसते त्यावेळी हे वाचन केले तर अति उत्तम.
- लहानग्यांना वाचनाच्या सवयीची ओळख करुन देण्यासाठी कोणतेही वय योग्य असते.
- मुलांच्या पुस्तके हातात धरण्याच्या क्षमतेचा विकास होण्यापूर्वीही आपण त्यांना पुस्तकातील छायाचित्रांआधारे माहिती देण्याचा प्रयत्न करु शकतो.
- मुलांची ऐकण्याची क्षमता व मानवी आवाजांना हुंकाराद्वारे प्रतिसाद देण्याची प्रक्रिया साधारणतः ४ महिने वयाच्या आधी सुरु होते. त्यामुळे मुलांना मोठ्याने वाचून दाखविण्याची क्रिया आपण त्यांच्या वयाच्या ४ ते ६ महिने या कालावधीत कधीही सुरुवात करु शकतो.




आकृती क्र १ अ आणि ब : लहानग्यांना वाचून दाखविण्याची सुरुवात

Ch-008.indd 3 11-09-2021 16:43:48

प्रश्न
(२)

## माझ्या ६ महिन्याच्या बाळाला मोठया आवाजात वाचून दाखविण्याचे काय फायदे आहेत?

- तुमच्या बाळाला मोठयाने वाचून ऐकविण्याने त्याची नवीन शब्दांची ओळख होते. त्याचा स्वत:चा असा स्वाभाविक शब्दसंग्रह तयार होतो जो त्याचे भाषाज्ञान समृध्द करण्यास मदत करतो.
- एकत्र वाचन केल्याने बाळाचे आपल्या पालकांसोबत भावनिक सुरक्षिततेचे, आपुलकीचे व मायेचे संबंध निर्माण होण्यास मदत होते.
- ही क्रिया मुलांची कल्पनाशक्ती वाढविते. तसेच त्यामुळे त्यांच्यामध्ये काही अनुकरणीय कौशल्ये निर्माण करण्यासही मदत करते. यातून मिळणाऱ्या अनुभवाने मुले त्यांच्या आपापल्या वातावरणातील अनेक गोष्टी शिकू शकतात. ही सर्व प्रक्रिया बाळाच्या मेंदूच्या विकासाला पोषक ठरते.
- वयानुरूप जेंव्हा तुम्ही बाळाकडे पाहून/उद्देशून स्मित हास्य करता, नापसंती व्यक्त करता (कपाळाला आठया घालून), चेहरा-तोंड फुगविता, वेगवेगळे हावभाव व्यक्त करता किंवा वेगवेगळे आवाज काढता, तेंव्हा बाळसुध्दा त्याचे अनुकरण करण्याचा व ते शिकण्याचा प्रयत्न करते/अनुकरण करायला शिकते. पर्यायाने या गोष्टी बाळाचे सामाजिक व खेळण्याचे कौशल्य विकास करायला मदत करतात.
- ६ महिन्याच्या व त्यावरील वयाच्या बाळांना पुस्तके वाचून दाखविल्याने त्यांचा त्यानंतर ४ वर्षानंतरच्या काळात जेंव्हा ते शालेय शिक्षण सुरु करतं तेंव्हा त्यांचा शब्दसंग्रह व वाचन कौशल्य वाढते हे संशोधनाद्वारे सिध्द झाले आहे.



**आकृती क्र २ :** वाचन करत असताना जेंव्हा आई हसते, कपाळाला आठ्या घालते, तसेच हावभाव बदलते आणि आवाजात चढउतार करते, तेंव्हा बाळ तिचे अनुकरण करते ह्यामुळे बोलण्याच्या आधी बाळाच्या हावभावांचा विकास होतो आणि त्याची सामाजिक कौशल्ये वाढीला लागतात

प्रश्न
(३)


## मी माझ्या मुलाशी सकारात्मक संवाद कशाप्रकारे साधू शकतो/शकते ?

- तुम्ही तुमच्या बाळाच्या नजरेला नजर भिडवून दिवसभरात शक्य तेवढे स्मित हास्य करा.
- बाळाशी संवाद साधण्यासाठी आई बाळाकडे बघून जे विविध आवाज काढते. त्यातून ती बाळाशी चांगले भावनिक संबंध जोडते.
- आईचा व पालकांच्या बाळाच्या बाल्यावस्थेत असणारा आश्वासक सहवास हा मुलांना सक्षम, स्वतंत्र व भविष्यात विविध आवाहनांचा सामना करण्याची ताकद देतो व त्यांच्यामध्ये जिद्द/मानसिक लवचिकता निर्माण करतो.






Ch-008.indd 4 11-09-2021 16:43:48




अ) मूल एक वर्षाच्या आत असताना बाळाकडे पाहून स्मितहास्य जरूर करा आणि त्यांच्या नजरेला नजर मिळवत जा. हे दिवसातून अनेकदा करत जा. ब) बाळाला एक जवळीकीचा आणि सुरक्षिततेचा भावना बंध द्यावा आणि त्याच्या आवडीत आपणही रस घ्यावा.

- मुलांशी बोलतांना व त्यांना जवळ घेतांना पालकांनी त्यांचे कौतुक करणारे व प्रोत्साहन देणारे शब्द वापरावेत.
- ६ ते ८ महिन्यांपर्यंत मुलांमध्ये अनोळखी व्यक्तीबद्दल जाणीव निर्माण होण्यास सुरुवात होते व १४ ते १६ महिन्याला ती जाणीव सर्वोच्च पातळी गाठते म्हणून या काळात मुलांना सुरक्षित वाटण्यासाठी पालक किंवा कुटुंबातील सदस्य आपल्या सभोवताली आहेत याची खात्री दिली पाहिजे.
- ज्या माता मोबाईल, टी.वी., लॅपटॉप यांसारख्या डिजिटल उपकरणांमध्ये जास्त गुंतलेल्या असतात, त्यांच्याकडून त्यांच्या बाळाशी भावनिक जवळीक निर्माण करण्याचा महत्वाचा कालखंड हातातून निसटून जाऊ शकतो आणि हे बाळाच्या सुरुवातीच्या मेंदूच्या विकासासाठी अत्यंत घातक आहे. त्यामुळे या डिजिटल उपकरणांमध्ये गुंतण्यापेक्षा मुलांना वेळ देण्यास प्राधान्य दया.



**आकृती ४ :** मुले जेव्हा विविध आवाज काढतात आणि खुणा करतात तेव्हा त्यांना हसून प्रोत्साहन द्यावे






Ch-008.indd 5 11-09-2021 16:43:48

प्रश्न (४)

## माझ्या मुलाने कुटुंबातील सदस्यांशी व त्यांच्या भावंडांशी संवाद साधणे कितपत महत्वाचे आहे?

- मुलाचा कुटुंबातील सदस्यांशी सकारात्मक संवाद अत्यंत महत्वाचा आहे. कारण कुटुंबातील सदस्यांचे वागणे पाहून, त्यांचे अनुकरण करुन, त्यांना आदर्श मानून ते आपल्यातील वाटा दुसऱ्यांना देणे, समस्या सोडवणे, एकत्र काम करणे इत्यादी महत्वाची मूल्य शिकत असतो.
- लहान वयामध्ये मुलांनी कुटुंबातील सदस्यांशी व भावंडांशी सुसंवाद साधणे हा त्यांच्या भविष्यातील सामाजिक व भावनिक कौशल्ये शिकण्याचा पाया ठरतो.
- कुटुंबातील भावंडांशी होणारा संवाद हा नेहमीच आनंददायी असतो असे नाही. घडलेल्या संवादातून काही क्षण असे येतात की मूलगा नाराज होतो, त्याला रागही येतो, अशावेळी पालक त्याचा राग शांत करु शकत नाहीत, पण अशा घटना म्हणजे मुलाला आपल्या वागण्याचा व भावनेचा तोल सांभाळण्याचे कौशल्य शिकविण्याची संधीच असते.
- समाजातील वागण्याचे व भावनिक तोल सांभाळण्याचे कौशल्य शिकण्यासाठी मुलांचे पालक व मोठी भावंडे यांचे वागणे, बोलणे हे मुलांच्या पुढे आदर्शवत असतात.




**आकृती क्र ५ अ आणि ब** : सामाजिक आणि भावनिक कौशल्ये शिकण्यासाठी पालक आणि भावंडे एक आदर्श बनू शकतात




Ch-008.indd 6 11-09-2021 16:43:48

प्रश्न (५)

## आपल्या सहभागातील हिस्सा दुसऱ्याला देणे हे जीवनकौशल्य (शेअरींग) माझ्या मुलाने आत्मसात करणे का महत्वाचे आहे ?

- आपल्यातील वाटा दुसऱ्यांना देणे, दुसऱ्यांची काळजी घेणे या गोष्टी पालक आपल्या कुटुंबात व्यवस्थितपणे करत असतील तर मुले आपली भावंडे व इतरांशी वागतांना हे मूल्य आचरणात आणतांना दिसतात.
- २ – ३ वर्षापर्यंतच्या मुलांना आपणच जगाच्या केंद्रस्थानी आहोत, कुटुंबात महत्वाचे आहोत, त्यामुळे आपल्या मागण्या लगेच पूर्ण व्हायला हव्यात असे वाटते. त्यांना एखादी गोष्ट मिळण्यासाठी वाट पाहणे, धीर धरणे, आपली पाळी येण्याची वाट पहाणे यांसारख्या गोष्टींची समज त्यांना नसते. आपल्यासारख्याच कुटुंबातील लोकांच्याही काही गरजा असतात, त्यांच्या काही मागण्या असतात हे समजण्याचे त्यांचे वय नसते.
- दुसऱ्याला मदत करणे, आपल्या वस्तू दुसऱ्याला देणे, सहकार्य करणे ही चांगली सामाजिक वर्तणूक आहे. सर्वसाधारणपणे ३ वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलांना शेअरींगची कल्पना समजत नाही. 'अमेरिकन अकॅडमी ऑफ पेडिॲट्रिक्स'च्या संदर्भानुसार शेअरींगची कौशल्ये साडेतीन ते चार वर्षे मुलाच्या वयांमध्ये दिसू लागतात.
- साडेतीन वर्षे वयानंतर मुलांमध्ये सहानुभूती, प्रतिसाद व शेअरींगची क्षमता विकसित होत जाते.



**आकृती क्र ६ :** मुले सहानुभूती, दुसऱ्याला सहभागी करून घेण्याची प्रवृत्ती आणि प्रतिसाद देण्याची क्षमता शिकताना

प्रश्न
(६)

## मी माझ्या मुलाला गोष्टी वाटून घ्यायला म्हणजेच शेअरींग करायला कसे शिकवू शकतो/शकते ?

पालक आपल्या वर्तणुकीतून मुलांमध्ये शेअरींग कौशल्ये विकसित करु शकतात. पालक मुलांच्या दैनंदिन जीवनात प्रेमळपणा, सहानुभूती, सहकार्य इत्यादी गोष्टी आपल्या भावंडांमध्ये व इतरांमध्ये व्यक्त करण्यासाठी तशी परिस्थिती निर्माण करु शकतात. उदा. प्रत्येकाला स्वतंत्र चॉकलेट घेऊन देण्याऐवजी एकच चॉकलेट घेऊन त्याचे वाटे सर्वांना दयायला शिकवू शकतात. तसेच गृहपाठ करतांना प्रत्येकास स्वतंत्र शैक्षणिक साहित्य न देता टेबलावर एकच खोडरबर, शार्पनर ठेवून सर्वांनी मिळवून वापरण्यास शिकवू शकतात. अशा प्रकारच्या उदाहरणातून स्वकेंद्रीत वृत्ती टाळून शेअरींगची वृत्ती विकसित करता येऊ शकते.

- पालक सभोवताली नसतांनाही शेअरींग कौशल्यातून मुलांना एकमेकांत तडजोड करणे, एकमेकांत सहकार्याने खेळणे, मनाविरुध्द गोष्ट घडली तरी सर्वांशी जुळवून घेणे यासारख्या गोष्टी शिकण्यास मदत होते. उदा. शाळा.
- कोरोनाच्या व लॉकडाऊनच्या काळात मुलांनी एकमेकांमधील संवादाच्या, शेअरींगच्या, स्वयंशिस्तक्षमता विकसित करण्याच्या खूप संधी गमावल्या आहेत.

**शेअरींग कौशल्ये विकसित करण्यासाठीचे ठळक मुद्दे :**

- घरगुती कामांत मुलांना सहभागी करा
- कुटुंबातील सदस्य घरगुती कामांच्या जबाबदाऱ्या वाटून घेतात हे मुलांसाठी चांगले प्रेरक उदाहरण ठरते.
- तुमच्या मुलांबरोबर तुमचे चांगले भावनिक नाते निर्माण करा. कामानिमित्त तुम्ही मुलांपासून दूर असतांनादेखील तुम्ही त्यांचाच विचार करता व त्यांच्या सहवासाला मुकता, या भावना त्यांना जाणवू दया.
- तुम्ही कामानिमित्त मुलांपासून दूर आहात, हयाबद्दलची अपराधीपणाची भावना मुलांसमोर व्यक्त करु नका.
- आपण मुलांना पुरेसा वेळ देऊ शकत नाही म्हणून त्याची उणीव काहीतरी भेटवस्तू देवून भरुन काढू नका.
- तुमची मुले ज्यावेळी दुसऱ्याविषयी सहानुभूती दाखवितात, मित्रांमध्ये मिळून मिसळून राहतात तेंव्हा त्यांच्या हया गुणांचे कौतुक करा. तसेच ती दुसऱ्यांना शेअरींग करतात त्यावेळी आपले पालक आनंदी होतात हेही त्यांना दाखवा.
- मुलांना ते शिकलेल्या गोष्टी स्वतंत्रपणे करण्याची संधी दया. उदा. स्वतःच्या हाताने खाणे, जिना चढणे, दात घासणे.
- मुलांची सुरक्षितता लक्षात घेऊन तुम्ही राहात असलेल्या भागात मुलांना इतर मुलांमध्ये खेळू दया.
- मुलांना जबरदस्तीने शेअरींग करायला लावू नका. तसेच ती शेअरींग करत नाहीत म्हणून त्यांना टोचणे, इतरांसमोर अपमानास्पद बोलणे अशा गोष्टी करु नका.
- मुलांच्या चिडण्या–ओरडण्याला शरण जाऊ नका. ज्यामुळे त्यांना जे हवे ते त्या ओरडण्या–रडण्यातून मिळविता येते हे ते शिकतील.





Ch-008.indd 8 11-09-2021 16:43:49

प्रश्न (७)

## १४ महिन्याच्या माझ्या मुलामध्ये कोणकोणती एकमेकातील स्नेहभाव जोपासणारी सामाजिक कौशल्ये असली पाहिजेत ?

- मुलाला त्याच्या सामाजिकीकरणाचा पहिला अनुभव त्याची काळजी घेणाऱ्या, त्याच्याभोवती वावरणाऱ्या आईकडून, आजीकडून व भावंडांकडून मिळतो.
- मुले काही घटनांना कसा साद प्रतिसाद देतात यावरुन त्यांच्या सामाजिक कौशल्याचा विकास लक्षात येतो. उदा. दुसऱ्याच्या हसण्याला प्रतिसाद देणे, हाकेला प्रतिसाद देणे, नजरेला नजर देणे इत्यादी. बालसुलभ खेळण्याला प्रतिसाद देणे.
- १२ ते १४ महिन्यांची मुले त्यांना हव्या हसणाऱ्या वस्तूकडे बोट दाखवून त्याची मागणी व्यक्त करतात. तर १४ ते १६ महिन्यांची मुले त्याच्यापुढे जाऊन वस्तुकडे व पालकांकडे आळीपाळीने पाहून पालकांचे आपल्या आवडत्या वस्तूकडे लक्ष वेधून घेतात आणि साधारणपणे १८ महिन्यांची मुले त्यांना आवडणारी वस्तू प्रत्यक्ष उचलून आणुन पालकांना दाखवितात व आपली इच्छा व्यक्त करतात.
- १४ महिन्याच्या आसपासची मुले लपाछपी, घोडाघोडा खेळणे ह्यांसारख्या खेळात भाग घेऊ शकतात. दुसऱ्याला टाटा करणे, नक्कल करणे, घरातल्या छोटया कामात लुडबुड करणे, आदी गोष्टी ते करायला शिकतात, त्यांना आवडतात. ८ ते १४ महिन्यांची मुले एखादा अर्थपूर्ण शब्द बोलू शकतात, तर १४ महिन्यांपर्यंत मुले २ ते ३ अर्थपूर्ण शब्द बोलू शकतात.
- १४–१५ महिन्यांची मुले जरी समवयस्कांमध्ये जुळवून घेऊन खेळू शकली नसली तरी अशी मुले त्यांच्याभोवती असणे त्यांना आवडते.







**आकृती ७ अ आणि ब :** अ) घरातील व्यक्तींना प्रतिसाद देताना मुलाच्या सामाजिक कौशल्यांचा अंदाज घेता येतो ब) मुले आपल्या आजूबाजूच्या समवयीन मुलांमध्ये रस घ्यायला लागतात. मात्र ती त्यांच्याशी सामंजस्याने खेळतील असे नाही

प्रश्न
(८)

## ‘सामाजिकीकरण’ माझ्या मुलाच्यादृष्टीने का महत्वाचे आहे? मुलाच्या सर्वांगीण विकासावर त्याचा काय परिणाम होतो?

- सामाजिकीकरणांमुळे मुलांचा आत्मविश्वास वाढतो, स्वप्रतिमा विकसित होते तर लाजाळूपणा, स्टेज भीती अशा गोष्टी दूर होतात ऐवजी लाजाळूपणा कमी होतो आणि सभाधीटपणा वाढतो. सामाजिक कौशल्ये विकसित होण्यासाठी मुलांनी स्वयंशिस्त शिकणे महत्वाचे आहे.

**स्वनियमन :**

- मुले स्वत:च्या भावना व्यक्त करणे, आपले वर्तन आपल्या गरजा व्यक्त करणे, आपली छोटी छोटी कामे इत्यादीमध्ये योग्य सुधारणा करतात त्यास स्वनियमन म्हणतात.
- ही स्वनियमनाची क्षमता मुलांमध्ये अंदाजे ६ महिन्यांपासून विकसित होण्यास सुरुवात होते व त्यामुळे ती इतरांशी संवाद साधण्यास शिकतात.
- सामाजिक आणि भावनात्मक कौशल्ये ही बहुतांश इतरांचा संवाद व संपर्कातून शिकली जातात.
- स्वनियमन हे सामाजिक जाणीव निर्माण करण्यास मदत करते. हया जाणीवेतून मुलांच्या मनाचे शास्त्र उलगडत जाते आणि यातूनच मुले, आपले विचार, भावना आणि मित्र, इतर सभोवतालची माणसे यांचे विचार व भावना यासारख्या नसतात हे शिकतात.
- ही सामाजिक जाणीव मुलांना इतरांच्याबद्दल सहानुभूती बाळगून, त्यांच्याबरोबर जुळवून घेण्यासाठीचे मार्ग शोधण्यास प्रोत्साहीत करते.
- स्वनियमन व भावना नियमन हे एकमेकांच्या हातात हात घालून चालतात. म्हणजे मुले स्वत:च्या व इतरांच्या भावनांचे निरीक्षण करतात. एकत्रितपणे त्यावर विचार करुन आपल्या गरजेप्रमाणे आपल्या वर्तणूक बदलाविषयी विचार प्रक्रिया राबवतात. पालकांनीही त्यांच्या भावनांचे निरीक्षण करुन तसे अनुकूल व आनंदी वातावरण ठेवले पाहिजे. कारण मुले पालकांचे सतत निरीक्षण करुन त्यातून शिकत असतात.
- सामाजिक जाणीव व सामाजिकीकरणामुळे आत्मविश्वास निर्माण होण्यास व स्वप्रतिमा सुधारण्यास मदत होत लाजाळूपणा कमी होतो आणि सभाधीटपणा वाढतो. स्वनियमन हे मुलांच्या अगदी लहान वयामधील विकासाचे एक महत्वाचे कौशल्य असल्याने मुलांनी ते लहान वयातच आत्मसात करणे महत्वाचे आहे.



Ch-008.indd 10 11-09-2021 16:43:49

प्रश्न
(९)

## माझ्या दोन वर्षाच्या मुलाचे योग्य सामाजिकीकरण होण्यासाठी व त्याच्या भाषेचा योग्य विकास होण्यासाठी 'स्पीच ॲप' व 'फोनिक्स ॲप'ची भूमिका काय आहे?

- डिजिटल ॲप्समधून मुले कदाचित भाषा शिकू शकणार नाहीत, पण पालक व मित्र यांच्याबरोबरीच्या संवादातून किंवा लहान मुलांची खेळणी व साहित्य यातून ते या गोष्टी शिकू शकतील.
- पहिल्या दोन वर्षे वयापर्यंत मुलांमध्ये मातृभाषा किंवा स्थानिक भाषा शिकण्याची क्षमताच जास्तीत जास्त असते. या कालखंडात मेंदूचे मज्जातंतू जास्तीत जास्त लवचिक असल्यामुळे जी भाषा त्यांच्या कानावर पडेल, तिचे उच्चार, बोलण्यातील चढदतार सफाईदारपणे लवकर आत्मसात करतात. म्हणून या वयात मुलांचा वेळ डिजिटल ॲप्समध्ये जाण्यापेक्षा त्याचे आई, वडील, आजी–आजोबा इ. जवळच्या नातेवाईकांनी त्यांच्याशी सुसंवाद साधणे खूप महत्वाचे आहे.
- जशी मुले मोठी होतात व त्यांचा मेंदू परीपक्क होतो तसे मज्जातंतूंची नवीन भाषा आत्मसात करण्याची क्षमता कमी होते. अशा परिस्थितीत नवीन भाषा शिकताना मुलाला निराशा येऊन त्याच्या वर्तणुकीत बदल होऊ शकतो.

**डिजिटल उपकरणामुळे होणारे संभाव्य तोटे :**

- अति लहान वयात डिजिटल उपकरणातून वाजविली जाणारी बडबडगीते, बालगीते ऐकल्यामुळे मुलांच्या मेंदूतील मज्जातंतूंचा मातृभाषा शिकण्याच्या प्रक्रियेवर नकारात्मक परिणाम होतो.
- यामुळे मुलांच्या भाषा बोलणे व संवाद साधण्याच्या कौशल्य विकासाला विलंब होऊ शकतो.
- अति लहान वयात मुलांना डिजिटल स्क्रीन (पडदा) व आवाजाची ओळख करुन दिल्यामुळे मुलांच्या शालेय पूर्व वयात जी सामाजिक कौशल्य शिकविली जातात त्यावर नकारात्मक परिणाम होतो.
- लहानपणापासून मुलांनी स्क्रीनवर बोटांनी स्वाइप केल्याने त्यांच्या अंगठा आणि तर्जनी पकडण्याच्या विकासात अडथळा येऊ शकतो.
- या वयात जर मुले डिजिटल स्क्रीनमध्ये अडकून पडली तर त्यांची डोळे व हात तसेच डोळे व पाय यांच्यातील समन्वय क्षमतेचा विकास कमी होऊ शकतो.




**आकृती ९ अ ते ड :** पहिल्या तीन वर्षांत झालेली सूक्ष्म हालचालींची वाढ पुढे वाचन आणि हस्ताक्षर चांगले होण्यास मदत करेल



Ch-008.indd 12 11-09-2021 16:43:49

प्रश्न
(१०)

## इंटरनेट, ॲप्लिकेशन्समुळे मुलांचे शिक्षण कशाप्रकारे प्रभावित झाले आहे?

- बालवाडी शिक्षण पध्दतीप्रमाणे काही इंटरनेट ॲप्लीकेशन्स मुलांच्या वाचन व स्पेलिंग कौशल्य विकासासाठी मदत करु शकतात. तथापि मुलांनी चांगली सामाजिक, भावनिक संवादात्मक कौशल्ये विकसित केल्याशिवाय मुलांना भाषा शिक्षणाच्या ॲपची ओळख करुन देऊ नये.
- ही कौशल्येमुले घरगुती वातावरणातून, भावंडाकडून, मित्रांकडून, कुटुंब सदस्याकडून निरीक्षणातून व अनुकरणातून चांगल्याप्रकारे शिकतात.
- वर उल्लेख केल्याप्रमाणे अति लहान वयात डिजिटल उपकरणांची ओळख ही, मुलांच्या मेंदूतील मज्जातंतूंच्या मातृभाषा किंवा स्थानिक भाषा शिकण्याच्या क्षमतेत अडथळा निर्माण करु शकते.
- म्हणून मुलांच्या कमीत कमी ३ ते ४ वर्षापर्यंत मुलांना शैक्षणिक उपयोगासाठी डिजिटल उपकरणांची ओळख करुन देण्यास थांबले पाहिजे.
- वयाच्या तीन वर्षांपर्यंत मुलांना पडदयावरील दृश्ये व वास्तव आयुष्य यांची सांगड घालणे कठीण जाते असे पुरावे उपलब्ध आहेत.
- डिजिटल स्क्रीनवरील दृश्ये लहान वयातच पाहत राहिल्यामुळे मुलांना त्याच्या सभोवताल, त्यातील खोली, त्यातील अंतर या संकल्पना समजून घेण्यात गोंधळ उडण्याची शक्यता असते.
- अति लहान वयात डिजिटल स्क्रीनचा अती वापर केल्याने मुलांच्या भाषिक, सामाजिक व संवाद आदी कौशल्य विकासावर व एकाग्रतेवर नकारात्मक परिणाम होतो.
- लॅपटॉप व संगणकावर घरुन काम करणाऱ्या पालकांनी मुलांना या उपकरणांपासून दूर ठेवले पाहिजे.
- मुलांच्या नवीन गोष्टी शिकण्याच्या प्रक्रियेत टी.व्ही. व डिजिटल उपकरणातील आवाज पार्श्वसंगीत (बॅक ग्राउंड म्युझिक) अडथळा निर्माण करु शकतात.
- जर पालकांना आपल्या मुलांना डिजिटल शिक्षणाच्या कार्यक्रमाची ओळख करुन दयायची असेल तर ती वयाच्या ३ वर्षांपर्यंत करुन देऊ नये व त्यानंतरही ओळख करुन दिल्यास पालकांनी त्यावर बारीक लक्ष ठेवावे.
- ३ ते ५ वर्षे वयापर्यंत मुलांना संपूर्ण दिवसात जास्तीत जास्त १ तास स्क्रीनचा वापर करण्याची मुभा दयावी.





Ch-008.indd 13 11-09-2021 16:43:50